# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. १५८/२०१७

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा निर्णय क्र. एनजीसी-१७/(१२८/१७) मशि-४, दि. ४ जुलै, २०१७ नुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून अस्तित्वात असलेल्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांना नवीन अतिरिक्त तुकडयांना जलदगतीने मंजुरी देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णयानुसार संबंधित महाविद्यालयांकडून अतिरिक्त तुकडयांचे प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी यापूर्वी जास्तीत जास्त ४ तुकडयांपर्यंतचे प्रस्ताव महाविद्यालयांकडून स्वीकारण्यात येत होते. तथापि, १२वी कला, वाणिज्य व विज्ञान विषयांमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्येत मोठया प्रमाणात झालेली वाढ लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कला (बी.ए.), वाणिज्य (बी.कॉम.) व विज्ञान (बी.एस्सी) प्रत्येकी ५ तुकडयांपर्यंत मर्यादा वाढविण्यात येत आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे-४११००७ )
जा.क्र. सीए/११९४/२०१७ )
दिनांक : ०३ ऑगस्ट, २०१७ )

3/8/17

उपकुलसचिव
( शैक्षणिक विभाग )

प्रति :
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये.